पुणे पोलीस

# पोलीस आयुक्त कार्यालय
# वाहतूक शाखा, पुणे शहर

PUNE CITY TRAFFIC POLICE

## रस्ता सुरक्षा अभियान


**आपणास हे माहीत आहे काय ?**

रस्त्यावरील अपघातातील जखमी व्यक्तीस सहकार्य व मदत केल्यास आपणास **पोलीस, हॉस्पिटल, न्यायालय, इमर्जन्सी सेवा** अथवा अन्य विभागामार्फत कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही.

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील रीट पीटीशन क्र. २३५/२012 मध्ये दिलेल्या निकालानुसार

## जखमी व्यक्तीचे प्राण वाचवणाऱ्या व्यक्तीस (Good Samaritan) कायदेशीर संरक्षण देण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत.

**त्या सूचनातील प्रमुख तरतुदी पुढील प्रमाणे आहेत.**



### NO COMPULSION TO REVEAL PERSONAL INFORMATION

अपघात प्रसंगी एक चांगली मदत करणारी व्यक्ती, (Good Samaritan) जी, रस्त्यावर जखमी झालेल्या व्यक्तीसाठी पोलीस किंवा आणीबाणी सेवा कळवते, त्याला त्याचे नाव आणि वैयक्तिक तपशील फोनवर किंवा वैयक्तिकरित्या प्रकट करण्यास भाग पाडले जाणार नाही. रुग्णालयाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या मेडिको लिगल केस (एम.एल.सी.) फॉर्ममध्ये देखील अशा व्यक्तीस वैयक्तिक माहिती उघड करणे स्वैच्छिक असेल.



### PROTECTION FROM CIVIL AND CRIMINAL LIABILITY

रस्त्यावरील अपघातग्रस्त व्यक्तींना मदत करण्यापासून उद्भवणाऱ्या कोणत्याही समस्येवर मदत करणाऱ्या व्यक्तीस (Good Samaritan) कोणत्याही न्यायालयीन दायित्वाचा सामना करावा लागणार नाही.



### NO DEMAND FOR PAY OR DETENTION AT HOSPITAL

अपघातातील जखमी व्यक्तीस औषधोपचारासाठी कोणत्याही रुग्णालयात आणणाऱ्या व्यक्तीस (Good Samaritan) रुग्णालयाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या मेडिको लीगल केस (एम.एल.सी.) फॉर्म मध्ये वैयक्तिक माहिती उघड करणे स्वैच्छिक असेल, तसेच त्याला हॉस्पिटलचे बील ॲडव्हान्स भरणेसाठी नाहक थांबवण्यात येणार नाही.



### POLICE INVESTIGATION CAN BE DONE ONLY ONCE. THROUGH VIDEO CONFERENCE

रस्त्यावरील अपघातातील जखमी व्यक्तीस सहकार्य व मदत करणाऱ्या व्यक्तीस पोलिसांकडून कुठल्याही प्रकारचा त्रास (Harassment) होणार नाही. अशा व्यक्तीस पोलिसांकडून जबाबदार धरले जाणार नाही. तसेच पोलीस तपासात प्रत्यक्षदर्शी असल्याचे ठरवून साक्षीदार बनण्याची सक्ती केली जाऊ शकत नाही. साक्ष नोंदवायची असल्यास एकाचवेळी व शक्य झाल्यास व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे देखील साक्ष नोंदवण्यात येईल.



### REWARD BY STATE GOVERNMENT

रस्त्यावरील अपघातातील जखमी व्यक्तीस वेळेवर सहकार्य व मदत केल्याने पीडित व्यक्तीचे प्राण वाचल्याचे सिद्ध झाल्यास, जखमी व्यक्तीचे प्राण वाचवणाऱ्या व्यक्तीस शासनातर्फे पुरस्कार देऊन गौरवण्यात येईल.

**या संदर्भात अधिक माहितीसाठी कृपया पुढील संदर्भीय दस्तऐवजांचे अवलोकन करावे.**

१. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल-रीट पीटिशन क्र. २३५/२0१२ मध्ये दिलेले दि. २९/१0/२0१४ चे निर्देश
२. केंद्र शासनाच्या रस्ते, परिवहन व राजमार्ग मंत्रालयाची अधिसूचना क्र. २५0३५/१0१/२0१४ - दि. १२/0५/२0१५
३. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २0१८/प्र. क्र. १३0. आरोग्य - ३ दि. २५/0४/२0१८